**<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>**

**प्रेस नोट दि.०६/०५/२०१८**

**<u>दि.०५/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३१२/१८,भादविक ३०७,५०६ |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय ७७ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | शुभम ऊर्फ पाम अजय शिंदे,रा.वडारवस्ती,येरवडा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०५/२०१८ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास सर्व्हे नं.११, जनतानगर, कोहीनुर डेकोरेटर्स मागे, येरवडा, पुणे येथे फिर्यादीचे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम शुभम उर्फ अजय शिंदे हा दोन अनोळखी मुलांना मारहाण करत असताना यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे-रामचंद्र बबनराव चव्हाण,वय ४२ वर्षे,रा.सदर हा त्यांचेमध्ये पडला व आमचे घराचे समोर भांडणे करु नका असे म्हणाल्याने अजय शिंदे हा म्हणाला की “तुम्हाला माहीत आहे का मी कोण आहे? असे म्हणुन, धमकी देवुन, फिर्यादीने त्याला तेथुन घालवुन दिले त्यानंतर यातील फिर्यादी यांचा मुलगा व त्याची बहीण हे घराचे समोर बोळामध्ये गप्पा मारत खुर्चीवर बसलेले असताना अजय शिंदे याने हातात बॅट घेवुन येवुन फिर्यादी यांचा मुलगा रामचंद्र चव्हाण याचे डोक्यात मारुन, गंभीर जखमी करुन, त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. रोहिणी शेवाळे ९५५२५६७४२३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ११९/१८,भादविक २७९,३०४(अ),३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | चंद्रकांत हुडे,वय ४३ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | मारुती झेन कारवरील अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१८ रोजी सायं.०५/३० वा.चे सुमारास सव्वातेरा नळी जहांगीर नगर,हडपसर, पुणे |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी महिला नामे- शिवकांत शंकर हुडे,वय ६८ वर्षे,रा.भिमनगर पुणे हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला आहे. तिस ससुन हॉस्पिटल येथे औषधोपचारासाठी ॲडमिट केली असताना, ती दि.०५/०५/२०१८ रोजी ००/३० वा.चे सुमारास उपचार दरमयान मयत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमित वाळके ८३२९३५०६६० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे १९६/१८,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | अंतरा सिन्हा,वय २५ वर्षे,रा.डी.पी.रोड,औंध,पुणे |
| **आरोपी** | एक महिला,(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०४/२०१८ रोजी रात्रौ २१/३० वा.ते दि.०३/०४/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान ब्लॉक सी १०२ सोलीटेअर पार्क, मेडिपॉईट हॉस्पिटल जवळ, डी.पी.रोड औंध ,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद महिला ही फिर्यादी यांचे घरी येवुन व सदर ठिकाणी घरी मुक्काम करुन, फिर्यादी यांची नजर चुकवुन फिर्यादी यांचे बेडरुमधील लोखंडी कपाटाच्या आतमध्ये अडकवलेल्या चावीने ड्राव्हर उघडुन त्यामधील सोन्याचे दागिने एकुण २ लाख रुपये किंमतीचे चोरुन करुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.व्हि.दोंडमिसे ९५०३७५८२८४ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** मुंढवा पो स्टे ११८/१८,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५)

**फिर्यादी** ए.एम.वाळके, पो.उप.निरी.मुंढवा,पो.स्टे.पुणे शहर

**आरोपी** १)वसंत विजय जाधव,वय ३४ वर्षे,रा.सर्वोदय कॉलनी,दर्ग्याचे पाठीमागे बुध्द विहारच्या जागेच्या बाजुला, मुंढवा,पुणे २)अविनाश राधेशाम ठाकुर, वय ३० वर्षे,रा.सदर ३)रवि यल्लप्पा गायकवाड ऊर्फ पाटील,वय ३४ वर्षे,सदर ४)नितीन ऊर्फ हुबळी नित्या शंकर जाधव,वय २३ वर्षे,रा.सदर ( अ.क्र.१,२,४ अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०४/०५/१८ रोजी रात्रौ २३/१० वा.चे सुमारास फडणीस बिल्डर यांचे बंद ऑफिसच्या बोळीत केशवनगर, मुंढवा,पुणे

**तपशिल** यातील नमुद इसमांनीआप-आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे, एक कोयता, चॉपर,लोखडी रॉड,दोरी, मिरची पुड इत्यादी घातक शस्त्रे तसेच दोन मोटार सयकली असा एकुन १ लाख ०१ हजार ८३०/- रु कि.चा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून, स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना मिळुन आले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. ए.जी.गवळी ८१०८५०११७७

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे९८/१८,भादविक २९४,३३२,३५३,५०४

**फिर्यादी** किशोर पडाळ,वय ५३ वर्षे,रा.भवानी पेठ पुणे

**आरोपी** राजा भूजबळ ऊर्फ ग्रिसींग राजा,रा.कस्तुरी चौक, गुरुवार पेठ, पुणे(अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०५/२०१८ रोजी १३/०० वा.सुमारास रुम नंबर १२०, पहीला मजला, पुणे महानगर पालीका मुख्य ईमारत, पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे उप अभियंता अतिक्रमण विभाग,पुणे महानगर पालीका पुणे येथे नोकरीस असुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी रुम नंबर १२०, पहीला मजला, पुणे महानगर पालीका मुख्य ईमारत,पुणे या ठिकाणी त्यांच्या कार्यालयात सरकारी कामकाज करीत असतांना यातील नमुद इसम नामे-राजा भूजबळ ऊर्फ ग्रिसींग राजा, हा फिर्यादीचे कार्यालयात येवुन सभागृह नेत्यांनी तुम्हाला भेटायला बोलावले असता, तुम्ही जावुन का भेटला नाहीस, असे म्हणून सभागृह नेत्याला भेटायला का गेला नाही याचा राग मनात धरुन फिर्यादीला हाताने तोंडावर, गालावर व डोक्यावर मारहाण करुन दुखापत करुन, शिवीगाळ करुन, फिर्यादीचा अपमान करुन सार्वजनिक शांतता भंग केला व शासकीय कर्तव्य पार पाडीत असताना फिर्यादीस त्या पासून परावृत्त केले आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. पी.ए.खटके ९५५२७२१७२१

## <u>दि.०६/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे ९१/१८,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** वल्लभ शिरोडकर, वय ५२ वर्षे,रा.बेला विस्टा राय, ता.सालसेट,दक्षिण गोवा

**आरोपी** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०५/२०१८ रोजी सकाळी ०५/४५ वा.चे सुमारास कॉन्टाकेटर आय हॉस्पिटल कोथरुड, पुणे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह त्यांचे मित्राकडे रिक्षाने जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे पत्नीचे ओटीत असलेली लेडीज पर्स त्यामध्ये रोख रक्कम, सोन्याच बांगडया, व एक मोबाईल असा एकुण ८२ हजार ६५०/-रुपये किंमतीचा ऐेजव जबरदस्तीने हिसका मारून, चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चव्हाण |
| **२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १६३/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | आर.एस.चव्हाण, पो.शि.विश्रांतवाडी,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | कंटेनर वरील अज्ञात चालक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०५/२०१८ रोजी २२/४५ वा.चे सुमारास आरोग्य भवन इंदिरानगर, विश्रांतवाडी, पुणे समोरील पुणे आंळदी रोडवर, येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.चौगुले ९९२१५२२१८५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**